<u>संशोधनाचा आराखडा</u>

<u>“ नांदेड जिल्ह्यातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या कौटुंबिक समरसतेचा अभ्यास ”</u>

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड

सामाजिक शास्त्रे विदयाशाखे अंतर्गत समाजकार्य विषयातील पीएच.डी (Ph.D.) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या संशोधनाचा संक्षिप्त आराखडा

संशोधक

उप्पोड संदीप रामराव

मार्गदर्शक

डॉ. जी.एस.येळणे

सहाय्यक प्राध्यापक, सामाजिकशास्त्र संकुल

स्वा.रा.ती.म.विदयापीठ,नांदेड

मार्च २०१६

“नांदेड जिल्ह्यातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या कौटुंबिक समरसतेचा अभ्यास”

प्रस्तावना

जन्म व मृत्यु हा आपल्या सर्वाच्या आयुष्यातील मूळ दोन टप्पे आहेत, या जन्म मृत्यु कालावधीत आपले जीवन वेगवेगळ्या टप्यामधून जात असतो. जन्म-बालपण-तारुण्य-वृद्धत्व आणि शेवट हे आपल्या जीवनातील घडून येणाऱ्या प्रक्रिया आहेत. बालपणामध्ये आपणनवीन जीवन जगात असतो व या जीवनातील प्रत्येक घडामोडीचा आस्वाद घेत असतो, बालपणामधून आपण किशोर वयामध्ये प्रवेश करतो यामध्ये आपण शिक्षण घेत जातो, प्रत्येक घडणाऱ्या घडामोडी आपण आत्मसात करतो. किशोर वयातून आपण जेव्हा तारुण्यात येतो तेव्हा आपल्या मूलभूत गरजा म्हणजेच अन्न, वस्त्र, निवारा या गरजा भागविण्याचे प्रयत्नात असतो. या गरजांसाठी आपण बालपणापासून किशोर वयात येत असताना घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग करतो. आणि त्यातून काही व्यवसायाचा आधार घेतात, काही नोकरीचा (शासकीयव निमशासकीय) आधार घेतात व ज्यांच्याकडे शिक्षण नाही असे वेगवेगळ्या कामामधून आपल्या गरजा भागवतात.

जे व्यक्ति शासकीय नोकरीचा पर्याय निवडले त्यांना वयाच्या ५८ वर्षापर्यंत नोकरी करता येते व त्यानंतर सेवानिवृत्ती घ्यावी लागते. आंतरराष्ट्रीय स्तरावर अमेरिका, स्वीडन इ. देशात सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्ष आहे. तर भारतात साधारणत: ६० वर्ष हे सेवानिवृत्तीचे वय मानले जाते व महाराष्ट्रात ५८ वर्ष निश्चित केले आहे. हा सेवानिवृत्तीचा काळ हा आपल्या आयुष्यातील शेवटच्या पूर्वीचा टप्पा आहे म्हणजेच **सेवानिवृत्ती**. सेवानिवृत्तीचा टप्पा हा वृद्धत्व काळातील आहे. सेवानिवृत्ती हा प्रत्येक शासकीय नोकरी निवडणाऱ्या व्यक्तीच्या आयुष्यातील एक अपरिहार्य असा टप्पा आहे.

सेवानिवृत्तीनंतर व्यक्तीच्या वैयक्तीक व सामाजिक जीवनात बदल घडुन येतो. या अवस्थेत शारीरिक तसेच मानसिक दुर्बल व निरनिराळ्या स्वरूपाचे त्रास होण्याची व त्याबरोबर सामाजिक, आर्थिक या इतर गोष्टी सोबत कौटुंबिक समायोजनाच्या समस्या उद्भवत असतात. सेवानिवृत्तीनंतरचा जीवनशैलीशी समायोजन साधणे कठीण जाते. अनेक व्यक्तींना सेवानिवृत्तीनंतर त्याचे उत्पन्न जवळपास निम्याने घटत असल्याने उद्भवणाऱ्या आर्थिक समस्याना तोंड दयावे लागते. (देसाई व नाईक,१९७०)

दैनंदिन जीवनक्रमात होत जाणारे अनिव्यार्य बदल पूर्वीच्या नोकरीत असलेले मानसिक कार्य समाधान व सामाजिक संपर्क यांचा झालेला लोप, अचानक होणाऱ्या प्रतिष्ठेतील बदल, सामाजिक भूमिका व संबंधातील घट, एकटेपणाची जाणीव निर्माण होणे. (भाटीया,१९८३) रिकाम्या वेळेत अचानक मोठ्या प्रमाणात झालेली वाढ व त्याचबरोबर आर्थिक उत्पन्नात झालेली घट यांच्या परिणामी रिकाम्या वेळेचा उपयोग घेण्याची असमर्थता अशा

अनेक कारणांनी सेवा निवृत्तांची मानसिक असतूंष्टता वाढत जाऊन त्यांच्यामध्ये चिडचिडेपणा निर्माण होत जातो, त्यामुळे बदलेल्या जीवनशैलीबद्दलचे असमाधान जास्त तीव्रतेने जाणवते. म्हणून सेवानिवृत्तीनंतरच्या जीवनशैली व कुटुंबात समायोजन व समन्वय साधणे कर्मचाऱ्यांना कठीण जाते. (लक्ष्मी प्रसाद व रमण रेड्डी,१९९५.शर्मा,१९९६)

सेवानिवृत्तीनंतर बदलत्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीला तोंड द्यावे लागल्याने सेवानिवृत्त कर्मचार्यांना अनेक प्रकारच्या समस्या उभ्या राहतात व कौटुंबिक, सामाजिक जीवनाचा साचा व घडी बदलत जाते. जसे की, एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये लहान मुले आणि घरातील वृद्ध यांना सामावून घेण्याची प्रक्रिया सहजपणे होत असे. किंबहुना लहान मुलांसाठी वृद्धांची गरज असे, परंतु बदलत्या काळाबरोबर अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. (बी.आर.जोशी,२००८) त्यांमध्ये जेंव्हा त्यांच्या आर्थिक उत्पन्नात घट होतो त्यावेळेस आर्थिकदृष्ट्या दुर्बल व परावलंबी (इतरांवर अवलंबून राहणे) असल्यामुळे पालनपोषण, उदरनिर्वाह, वैद्यकीय उपचारार्थ करावा लागणारा खर्च योग्य सुख सुविधांचा अभाव त्याचबरोबर परस्पर सह्योगाचा अभाव, एकटेपणाची भावना निर्माण होते, वैयक्तीक स्वातंत्र्य हिरावले जातात असे दुर्व्यवहार व गंभीर प्रश्न कर्मचाऱ्यांपुढे कुटुंबात समायोजन करताना निर्माण होतात. (रथबार्न मैककुअन,१९८०)

<u>साहित्य परीक्षण</u>

१. **देसाई व नाईक (१९७०)** यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक, मानसिक, शारीरिक, कौटुंबिक दृष्टिकोनाचा अभ्यास केला आहे. त्यांच्या मते सेवानिवृत्तीनंतर व्यक्तीच्या वैयक्तीक व सामाजिक जीवनात बदल घडुन येतो. त्या बदलाच्या अनुषंगाने सेवानिवृत्त व्यक्तीस पुढील समस्या येतात. त्यामध्ये आर्थिक उत्पन्नात घट होणे, सामाजिक दर्जा खालावणे, शारीरिकदृष्टया दुर्बल होणे व मानसिक असंतुष्टता निर्माण होते, त्यामुळे त्याला कौटुंबिक समस्यापण निर्माण होतात असा निष्कर्ष काढला आहे.

२. **पी.लक्ष्मी.श्रीनिवास प्रसाद व रमन्न रेड्डी(१९९५)** यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवेमध्ये असताना व सेवानिवृत्त झाल्यांनतर होणाऱ्या बदलावर प्रकाश टाकला आहे. यांच्या अध्ययनानुसार वाढत्या वयानुसार कार्यक्षमतेची घटनाही त्यांच्या पदाशी संबधित आहे. सेवेच्या काळामध्ये ते अधिक उर्जावान व उत्साहित होते त्यामुळे त्याचा ऑफिसमध्ये व समाजामध्ये उच्च स्थान व प्रतिष्ठा होती परंतु ज्यावेळेस ते सेवानिवृत्त झाले त्यावेळेस ते वाढत्या वयानुसार त्यांच्या कार्यक्षमतेमध्ये ह्रास झाला व समाजामध्ये समन्वय साधणे कठीण झाले असा निष्कर्ष त्यांनी काढला.

३. **भाटीया(१९८३)** यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेचा व सामाजिक सबंधाच्या दृष्टिकोनावर प्रकाश टाकला आहे. त्यांच्या मते सेवानिवृत्तनंतर आपल्या समुहात व समाजात मान मर्यादा व प्रतिष्ठेचा ह्रास होतो. म्हणून त्यांच्या ज्या सामाजिक भूमिका व सबंध असतात त्या त्यांच्यापासून हिरावुन घेतल्या जातात. त्यामुळे त्यांना एकटेपणाची जाणीव निर्माण होत असते.

४. **रथबार्न मैककुअन (१९८०)** यांनी वृद्धांच्या कुटुंबामध्ये होणाऱ्या अत्याचार व दुर्लक्ष, उपेक्षा ह्या घटकावर प्रकाश टाकला आहे. त्यांच्यामते वृद्धावस्थेत असलेल्या व्यक्तीमध्ये आर्थिक उत्पन्नात घट होतो. त्यामुळे त्यांच्यासोबत दुर्व्यवहार, अव्यवहार केला जातो.

५. **शर्मा(१९९६)** यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या वृद्धावस्थेतील कौटुंबिक समायोजनात होणाऱ्या बदलाचा व समस्यांचा अभ्यास केला आहे. यांच्यामते आर्थिक संपत्ती ही कुटुंबाची एक महत्वपूर्ण शक्ती आहे त्यामुळे सेवानिवृत्तांना मिळणारी पेन्शन त्यांच्या कुटुंबातील स्थान व दर्जा निर्धारित करतो.

६. **डॉ.बी.आर.जोशी** यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या वृद्धावस्थेतील कौटुंबिक समायोजनात होणाऱ्या बदलाचा अभ्यास केला आहे.यांच्यामते सेवानिवृत्तनंतर आर्थिक स्थितीत बदल होऊन उत्पन्नाचे प्रमाण कमी होते त्यामुळे त्यांच्या कौटुंबिक व सामाजिक जीवनाचा साचा व घडी बदलत जाते.

संशोधनाचे महत्त्व

१. सेवानिवृत्त म्हणजे सेवामधुन मुक्त होणे, सेवानिवृत्त हे ऐच्छिक असतेतर कधी अनिवार्य असते. अशा सेवानिवृत्तीनंतर त्याच्या ज्या नियमित दिनचर्या होत्या त्यामध्ये अचानक बदल होतो त्यामुळे त्या बदलाचा स्वीकार करणे सेवानिवृत्त व्यक्तीस कठीण जाते. परिणामत: त्याच्यासमोर अनेक समस्या निर्माण होतात. त्या होणाऱ्या बदलाचा व त्यांच्यासमोर येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी संशोधनाचे महत्त्व असेल.
२. सेवानिवृत्त कर्मचारी आपल्या जीवनशैलीमध्ये अचानक होणाऱ्या बदलातून तो कुटुंब व समाजात कसा समायोजन व समन्वय साधतो या अभ्यासाच्या दृष्टीकोनातून संशोधन करण्यात येईल.
३. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या समाज व परिवाराकडे बघण्याचा दृष्टीकोन व समाज व परिवाराचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनाचा अभ्यास करण्यासाठी संशोधनाची मदत होईल.

४. सेवानिवृत्तनंतर कर्मचाऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक, शारीरिक, मानसिक, कौटुंबिक घटकात होणाऱ्या बदलांचा अभ्यास करण्यास संशोधनाची मदत होईल.

५. सेवानिवृत्तहा एक वयोमर्यादेनुसार सेवेतुन मुक्ती व रजा अशी एक स्वाभाविक प्रक्रिया आहे. त्यामुळे सेवानिवृत्तीचे वेगवेगळया शासकीय क्षेत्रामध्ये वेगवेगळया सेवेच्या वयोमर्यादा ठरविल्या आहेत. त्या अनुषंगाने संशोधन करणे फार महत्त्वाचे आहे.

६. सेवानिवृत्तनंतर कर्मचाऱ्यांच्या उत्पन्नात घट झाल्यामुळे सामाजिक व आर्थिक परिस्थितीला तोंड द्यावे लागते त्यामध्ये निर्माण होणाऱ्या जसे की समाजातील दर्जा, परस्पर सहयोगाचा अभाव, एकटेपणाची भावना निर्माण होते, वैयक्तिक स्वातंत्र्य हिरावले जातात, पालन पोषण, उदरनिर्वाह, शारीरक व मानसिक दबाव इत्यादी घटकाचा अभ्यास करण्यासाठी संशोधन हे महत्त्वाचे आहे.

संशोधनाचे उद्देश

१. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शारीरिक, मानसिक समस्यांचा अभ्यास करणे.
२. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना कौटुंबिक समरसतेत येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
३. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या बदलत्या दर्जा व भूमिकेचे अध्ययन करणे.
४. सेवानिवृत्तनंतर वाढणाऱ्या नैराश्याचा व एकटेपणाचा अभ्यास करणे.
५. सेवानिवृत्तनंतर कुटुंबात वाढणाऱ्या मानसिक दुरावा व ताणतणावाचा अभ्यास करणे.
६. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या व्यक्ति स्वातंत्र्यावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

संशोधनाचे गृहीतके

१. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शारीरिक, मानसिक समस्यांचा वयाशी संबध आहे.
२. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना कुटुंबात समायोजन करताना अनेक समस्या निर्माण होतात.
३. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या बदलत्या दर्जा व भूमिकेचा उत्पन्नासोबत संबध आहे.
४. कर्मचाऱ्यांकडे कुटुंबाचा पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो.
५. सेवानिवृत्तनंतर वाढणाऱ्या एकटेपणाचा भास होतो.
६. कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या काळातील व सेवानिवृत्तनंतरच्या जीवनशैलीमध्ये बदल होतो.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्ट्याच्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे. या पद्धतीद्वारेच संशोधनात वस्तुनिष्ठता येत असते. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या कौटुंबिक समरसतेचा अभ्यास या विषयासंबंधी क्रमबद्ध व वस्तुनिष्ठ ज्ञान प्राप्त करण्यासाठी गुणात्मक व संख्यात्मक अश्या दोन्ही संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल.

संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती तशी व्यापक होऊ शकते परंतु संशोधनाच्या सोयीसाठी महाराष्ट्रात एक महत्वाचा जिल्हा असलेल्या नांदेड जिल्ह्यातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या कौटुंबिक समरसतेचा अभ्यास या क्षेत्रा पुरते मर्यादित आहे. विशेषत: संशोधनाचा कालावधीइ.स. २०११-२०१५ असून या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या उत्तरदात्यांचा चिंकित्सक अभ्यास या संशोधनात करण्यात येईल.

संशोधनाचा आराखडा

प्रस्तुत संशोधनाविषयी अभ्यास करण्यासाठी अन्वेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. कारण हाविषय सामाजिक विद्याशाखेतून संशोधित केला जाणार आहे व संशोधन प्रश्नाच्या अनुषंगाने अभ्यास केला जाणार आहे. म्हणून शास्त्रशुद्ध संशोधनासाठी अनेक संशोधन पद्धतीपैकी वर्णानात्मक व अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधनाच्या मर्यादा

- प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातील नांदेड जिल्हयापुरतेच मर्यादितआहे. ह्या जिल्ह्यातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या कौटुंबिक समरसतेचा अभ्यास ह्याच अनुषंगाने प्रामुख्याने अध्ययन करण्यात येणार आहे.
- संशोधन हे प्रामुख्याने शासकीय सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पुरतेच मर्यादित राहील.
- प्रस्तुत संशोधन हे इ.स. २०११ ते २०१५ ह्या कालावधीमध्ये सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यापुरतेच मर्यादित राहील.

नमुना निवड

नांदेड जिल्ह्यातील एकूण १६ तालुक्यातील इ.स. २०११ ते २०१५ ह्या कालावधीत एकूण शासकीय सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या १०% ह्याप्रमाणे अभ्यासासाठी गैर संभव्यता नमुना निवडीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीचा अवलंब करून १०% ह्या नमुन्याची निवड करण्यात येईल.

तथ्य संकलन पद्धती

प्रस्तुत विषयी संशोधन करताना संशोधनाच्या प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

१. प्राथमिक माहितीचे स्त्रोत

प्रस्तुत संशोधनाविषयी संशोधन करण्यासाठी मुलाखत अनुसूची व निरीक्षण या तंत्र साधनांचा वापर केला जाणार असून यात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या आर्थिक, सामाजिक, मानसिक स्थितीवर कौटुंबिक समायोजनात येणाऱ्या अडचणीची माहिती प्राप्त केली जाणार आहे तसेच व्यष्टी अध्ययन करण्याकरिता चेकलिस्ट वापरण्यात येईल.

२. द्वितीय माहिती स्त्रोत

प्रस्तुत संशोधनाच्या दृष्टीकोनातून महत्वपूर्ण माहिती प्राप्त करण्यासाठी दुय्यम सामुग्रीचा वापर करण्यात येईल. यांमध्ये सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या कुटुंब समायोजनात येणाऱ्या अडचणी याविषयी विविध पुस्तके, ग्रंथ, मासिके, लेखव इंटरनेट इत्यादी सामुग्रीच्या साहय्याने दुय्यम माहिती प्राप्त करण्यात येणार आहे.

तथ्यांचे विश्लेषण

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक साधनांच्या साह्याने मिळवलेली माहिती विखुरलेली असल्यामुळे तसेच त्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी विविध सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात येईल. संग्रहित माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी वर्गीकरण, सारणीकरण, कोडबुक, मास्टर चार्टचा वापर करण्यात येईल. तसेच संगणकाच्या एस.पी.एस.एस प्रणालीचा मदत घेऊनही तथ्य विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरणीकरण

प्रस्तुत संशोधनामध्ये संग्रहित माहिती खालील प्रकरणांच्या माध्यमातून मांडण्यात येईल.

प्रकरण १. प्रस्तावना

प्रकरण २. संशोधन पद्धती

प्रकरण३. सेवानिवृत्तीची कुटुंबामध्ये व समाजामध्ये समायोजन व समस्या

प्रकरण४. व्यष्टीअध्ययन

प्रकरण५. निष्कर्ष, सारांश, गृहीतकृत्यांची तपासणी, सैद्धांतिक आशय व सूचना

साहित्य संदर्भ

1. Desai K.G. and Naik H.M. (1970) “Problems of Retired people in grater Bombay: Tata Institute of Social Science” (International Research Journal of Social Science Vol.4 (3) Pg. No. 19-26 (March 2005)

2. P. Lakshmi Shrinivas Prasad and Dr. Ramana Reddy (Oct 1995) “Impact of age and experience of Supervisory Efficiency the Indian Journal of Social Work” (Seva Nivrat Ek Samja Shastriya Aadhyan– Unpublished Pandit Ravi Shankar Shukla University, Raipur Chattisgadh Pg. No. 35)

3. Bhatia H.S. (1983) “Aging and Society: A Sociological Study of Retired Public Servants Udaipur, The Arya Book Center Publishers.

4. Rathbone McCoin-E (1980) “Elderly Victims of Family Violence and Neglect Social Case Work” 61(4) Pg. No. 296-304

5. Sharma (1996) “वृद्धावस्था की समस्याऔ का एक मनोवैज्ञानिक अध्ययन” (अप्रकाशित) पंडीत रविशंकर विश्वविद्यालय रायपुर pg.no. 109

6. Dr. B. R. Joshi (2008)“Old age (Adjustment-Family Life) पुस्तक सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिद्धांताचा कोश समाजशास्त्र व मानवशास्त्र, डायमंड पब्लिकेशन, पुणे pg.no. 529

संशोधक

संदीप रामराव उप्पोड

मार्गदर्शक

डॉ. घनश्याम येळणे

सहाय्यक प्राध्यापक, सामाजिकशास्त्र संकुल

स्वा. रा. ती. म. विदयापीठ नांदेड